# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य,पुणे.
## तळ मजला, जुनी मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी – sceapune@gmail.com**


जा.क्र.रासनिप्रा/निवडणूक नियम ४/ड वर्ग संस्था/निवडणूक मा.सु./ ९५४९/२०२०.
दिनांक : ०६/०५/२०२०.

**वाचावे** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७६
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१७ दि.६.०८.१८
३. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग आठ, दि.२३.०७.२०१९ मध्ये नमूद महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम २०१९ मधील सुधारणा.

**विषय :- निवडणूक नियम २०१४ व सुधारीत निवडणूक नियम २०१७ चे नियम ४ नुसार 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रीयेबाबत मार्गदर्शक सुचना...**

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (कब) (१) नुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी 'राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण' चे गठन करण्यात आले आहे. सदर प्राधिकरणामार्फत सहकारी संस्थांच्या संचालक मंडळ सदस्यांची सार्वत्रिक निवडणूक, नैमित्तिक रिक्त पदांची निवडणूक व पदाधिकाऱ्यांची निवडणूक घेणेचे अधिकार प्राधिकरणास आहेत.

राज्य शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ हे नियम दि.११.०९.२०१४ रोजी अधिसुचित केले असुन, सदर नियम दि.१२.०९.२०१४ पासुन अंमलात आले आहेत. सदर नियमांमध्ये राज्य शासनाने वाचावे क्रमांक २ अन्वये दि.६.०८.२०१८ रोजी सुधारणा प्रसिद्ध केल्या आहेत. तसेच वाचावे क्र.३ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सुधारणा झाली असुन सहकारी गृहनिर्माण संस्थांकरीता कलम १५४-ब हे स्वतंत्र प्रकरण समाविष्ट करण्यात आले आहे. तसेच सुधारीत कलम ७३ सीबी (११) मधील परंतुकानुसार २५० किंवा त्यापेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांनी संस्थेची निवडणूक प्रक्रीया संस्थास्तरावर शासनाने विहीत केलेल्या रितीने पुर्ण करावयाची आहे. परिणामी, अशा संस्थांची निवडणूक प्रक्रीया प्राधिकरणाने घेणे अपेक्षित नाही.

राज्यातील सर्व सहकारी संस्थाच्या निवडणूकासाठी संस्थांचे उक्त निवडणूक नियमातील नियम ४ मध्ये 'अ', 'ब', 'क', व 'ड' असे वर्ग करण्यात आलेले आहेत. 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासंबधी निवडणूक नियमातील नियम ७६ मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे या वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका विशेष अधिमंडाळाचे बैठकित घेण्यात येणार असुन या निवडणूका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या पॅनेलमधील नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली होणार आहेत.

'ड' वर्ग संस्थांच्या निवडणूकी बाबत प्राधिकरणाने यापुर्वी निर्गमित केलेली परिपत्रके रद्द करण्यात येत असुन, सुधारीत निवडणूक नियमांच्या अनुषंगाने या संस्थांच्या निवडणुका व्यवस्थितपणे व सुरळीतपणे पार पाडण्याकरीता प्राधिकरण निवडणूक नियमातील नियम ३(v) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करीत आहे.

१. सहकारी संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ नियम ५(२) अन्वये नमुना ई-२ मधील माहिती संस्थेच्या समितीची मुदत संपण्याच्या अगोदर १८० दिवस तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकाऱ्यास देणे बंधनकारक आहे.
२. ई-२ नमुन्यासोबत संस्थेचे मंजुर उपविधीची प्रत तालुका/ प्रभाग सहकारी निवडणुक अधिकाऱ्यास देणे.
३. संस्थेने प्रारुप मतदार यादीची प्रत नमुना ई- ३ नुसार समितीचा कार्यकाल संपण्यापूर्वी कमीत कमी ६० दिवस अगोदर तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकाऱ्यास सादर करणे.

## मतदार यादी

४. अ. प्राथमिक मतदार यादी तयार करताना संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६ आणि कलम २७ व संस्थेचे मंजूर उपविधीमधील तरतुदी विचारात घेऊन प्राथमिक मतदार यादी तयार करणे आवश्यक आहे.

ब. संस्थेने सभासद नोंदवहीवरुन ई-३ नमुन्यात प्राथमिक मतदार यादी तयार करुन ती तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांचे कार्यालयास सादर करावी.

क. तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने सदर यादी प्राप्त झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत अंतिम मतदार यादीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे प्रसिद्ध करावा.

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करणे (संस्थेचे सचिव व तासनिअ यांनी अनुक्रमे संस्थेच्या व कार्यालयाच्या नोटिसबोर्डवर) | प्रारुप मतदार यादी प्राप्त झाल्यापासुन ७ दिवसाचे आत प्रसिद्ध करणे. |
| २ | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप व हरकती मागविणे | प्रारुप मतदार यादी प्रसिद्धीच्या दिनांकापासुन कार्यालयीन कामाचे ७ दिवसात तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात आक्षेप दाखल करता येईल. |
| ३ | प्रारुप मतदार यादीवरील आक्षेप व हरकती वर निर्णय घेणे | प्रारुप मतदार यादीवरील हरकती व आक्षेप दाखल करण्याच्या शेवटच्या दिनांकापासून ७ दिवसांचे आत तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निर्णय घेणे. |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे | हरकती व आक्षेपावरील निर्णयाच्या दिनांकाच्या लगतच्या पुढील दिनांकास तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी व संस्थेने अनुक्रमे कार्यालयाच्या व संस्थेच्या नोटिसबोर्डवर प्रसिद्ध करणे. |

ड. तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने अंतिम मतदार यादी निवडणूकीसाठी नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यास सुपूर्द करावी. अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासुन ती ७ दिवसांचे आत वरीलप्रमाणे नियुक्त प्राधिकृत अधिकाऱ्यास सुपूर्द करावी.

इ. प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती :- प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या पॅनेलमधील कर्मचारी / अधिकाऱ्यांमधुन निवडणूक नियम ७६(२) नुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडुन केली जाईल.

ई. संस्थेने प्रारुप व अंतिम मतदार यादी संस्थेचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी व प्रसिध्दी अहवाल (पंचनामासह) तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांना त्याच दिवशी सादर करावा.

## अधिमंडळाच्या विशेष बैठकीची कार्यवाही

५. प्राधिकृत अधिकाऱ्याने संस्थेचे निवडणुकीबाबतची अधिमंडळाच्या विशेष बैठकीची सुचना विहीत नमुन्यात तयार करावी (प्रपत्र १). त्यात बैठकीचा दिनांक, वेळ, स्थळ, विषय नमुद करावा व ही नोटीस संस्थेचे नोटीस बोर्डवर आणि निबंधकाचे नोटीस बोर्डवर सचिव / प्राधिकृत अधिकाऱ्याने नोटीस काढल्याच्या दिनांकाचे दिवशीच प्रसिध्द करावी (सहकारी संस्थांची विषयांकीत बैठक ही प्राधान्याने रविवारी आयोजित करावी) व प्रसिध्दी अहवाल संस्थेच्या किमान ५ सदस्यांचे स्वाक्षरीसह प्राधिकृत अधिकाऱ्याने तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांना नोटीस प्रसिध्दीच्या दिनांकाच्या दिवशी देण्यात यावा. तसेच ही नोटीस संस्थेचे सचिव / व्यवस्थापक यांनी सर्व सभासदांना संस्थेच्या अभिलेख्यात नोंदलेल्या पत्त्यावर पाठविल्याची खात्री प्राधिकृत अधिकाऱ्याने करावी. बैठकीची नोटीस पाठवल्याचा दिनांक व बैठकीचा दिनांक यात १५ दिवसांपेक्षा कमी कालावधी असु नये याची दक्षता प्राधिकृत अधिकाऱ्याने घ्यावी. तसेच सभेसाठीचा कोरम पुर्ण न झाल्यास सभा अर्ध्या तासासाठी तहकुब करुन त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर सभा घेणेबाबत बैठकीचे नोटीसीत स्पष्ट नमुद करणे अनिवार्य आहे. सदर नोटीसमध्ये संस्था समितीच्या निवडणुकीसाठी **अधिमंडळाची बैठक** असा स्पष्ट उल्लेख करावा व खालील नमुद एकच विषय विषयसुचीत नमुद करावा,

"**सभेचा विषय :** -------------------- सहकारी संस्थेचे व्यवस्थापन समितीचे निवडणुकीसाठी - -------कालावधीसाठी उपविधीतील तरतुद क्र.-------अन्वये ---------------- जागांसाठी संचालकांची निवड करणेसाठी ---------------------------------

प्राधिकृत अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सभा दिनांक------------- स्थळ-------- ------ वेळ -------- घेण्यात येणार आहे," असे स्पष्ट नमुद करावे.

संस्थेच्या उपविधीत संचालक मंडळ रचनेबाबत काहीही नमुद असले तरी प्राधिकृत अधिकाऱ्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ ब अन्वये अनुसुचित जाती किंवा अनुसुचित जमाती सदस्यांसाठी एक पद, इतर मागासवर्गीय सदस्यांसाठी एक पद आणि विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय सदस्यांसाठी एक पद असे एकुण तीन आरक्षणाचे पदांसाठी निवडणुक घेणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अन्वये महिलांकरीता दोन जागांसाठी निवडणुक घेणे अनिवार्य आहे. मात्र सहकारी संस्थेत अधिनियमाचे कलम ७३ ब व कलम ७३ क या राखीव प्रवर्गातील सभासद उपलब्ध नसल्यास अशा संस्थांच्या समितीच्या निवडणूकीस असे आरक्षण लागु होणार नाही. तसेच अशा प्रवर्गातील सभासद संस्थेत नसल्यास सदरच्या राखीव प्रवर्गातील जागा हया समिती गठीत करण्यासाठी व गणसंख्येकरीता विचारात घेण्याची आवश्यकता राहत नाही. मात्र भविष्यात अशा प्रवर्गातील व्यक्ती संस्थेस उपलब्ध झाल्यास वरीलप्रमाणे नमुद केलेली तरतुद रद्द समजण्यात यावी. याबाबत आणखी आवश्यकता असल्यास प्राधिकरणाचे आदेश क्र.७९१०/२०१८ दि.३.११.२०१८ पहावेत. प्राधिकृत अधिकाऱ्याने सदर अधिमंडळाचे विशेष बैठकीसाठी स्वंतत्र इतिवृत्त नोंदवही ठेवावी व ती प्राधिकृत अधिकाऱ्याचे स्वाधीन असेल.

बैठकीस उपस्थित राहणाऱ्या सभासदांचे उपस्थितीबाबत त्यांचे नाव व स्वाक्षरीसह इतिवृत्त नोंदवहीत नोंद प्राधिकृत अधिकाऱ्याने घ्यावी. उपस्थित सभासदांपैकी अंतिम मतदार यादीत नावे समाविष्ट असलेली सभासदांची संख्या व अंतिम मतदार यादीत नावे समाविष्ट नसलेल्या सभासदांची संख्येची इतिवृत्त नोंदवहीत नोंद घ्यावी. तसेच कोरम पुर्ण झाला आहे किंवा नाही, नसल्यास सभा अर्धा तास तहकुब करावी व पुन्हा सभा सुरु झाली याची नोंदही इतिवृत्तात घ्यावी.

प्राधिकृत अधिकाऱ्याने अधिमंडळाचे विशेष बैठकीचे निर्धारीत दिनांक, वेळी व स्थानी हजर होऊन प्रथम बैठकीचे ठिकाणी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणुन नियुक्त केलेची उद्घोषणा करावी व पुढीलप्रमाणे निवेदन करावे.

" उपस्थित सन्माननीय सभासद बंधु / भगिनींनो, आपली संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ४

अन्वये निवडणुकीचे प्रयोजनार्थ 'ड' वर्गात मोडते व नियम ७६ अन्वये 'ड' वर्गातील सहकारी संस्थेची व्यवस्थापन समितीची निवड ही संस्थेचे अधिमंडळाचे विशेष बैठकीत घेण्याची तरतुद आहे. त्यानुसार या सभेचे आयोजन केलेले आहे. नियमातील तरतुदीनुसार राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने माझी या सभेचे अध्यक्ष म्हणुन नियुक्ती केलेली आहे. त्यांचे दिनांक ----- चे आदेशान्वये मी -------- प्राधिकृत अधिकारी आपल्या संस्थेचे सन .......... ते सन .......... कालावधीकरीता व्यवस्थापन समितीचे निवडीकरीता या सभेचा अध्यक्ष म्हणुन उपस्थित आहे. सभेची वेळ .......... वा. असुन सभेत एकुण .......... सभासद उपस्थित असुन संस्थेचे उपविधीतील तरतुद क्र.................. अन्वये कोरम पुर्ण झाला आहे./ कोरमअभावी अर्धातासासाठी सभा तहकूब करण्यात येऊन अर्धा तासानंतर तहकूब सभा घेण्यात येत आहे. तहकूब सभेकरीता कोरमची आवश्यकता नाही. उपस्थित सभासदांपैकी अंतिम मतदार यादीत नाव असलेल्या सभासदांनाच निवडणुक प्रक्रियेत मत देण्याचा/ नामनिर्देशन करण्याचा अधिकार आहे. ज्यांचे नाव अंतिम मतदार यादीत नाही त्यांना निवडणुकीसाठी उमेदवार होणेचा, उमेदवारास सुचक अनुमोदक होणेबाबत व उमेदवार निवडीसाठी मत देण्याचा अधिकार नाही " याची नोंद घ्यावी.

त्यानंतर विषय पत्रिकेवरील एकमेव विषयाचे वाचन करुन निवडुन द्यावयाच्या समिती सदस्यांची संख्या, आरक्षणाच्या जागांची घोषणा करेल व सुचक, अनुमोदकाच्या नावासह उमेदवारांचे नामनिर्देशन नमुना इ-५ मध्ये करण्याची सुचना करेल.

प्राधिकृत अधिकारी सुचक, अनुमोदकांच्या नावासह उमेदवारांची इतिवृत्तात नोंद घेऊन त्यांच्या संमतीदर्शक स्वाक्षऱ्या घेईल व प्राप्त नामनिर्देशनांची उद्घोषणा करेल व उद्घोषणेची इतिवृत्त नोंदवहीत नोंद घेईल.

प्राधिकृत अधिकारी प्राप्त नामनिर्देशनपत्रांची छाननीअंती वैध नामनिर्देशन पत्रांची उद्घोषणा करेल व त्याची इतिवृत्त नोंदवहीत नोंद घेईल.

प्राधिकृत अधिकारी नामनिर्देशन माघारी घेणेबाबत उमेदवारांना विचारणा करेल याबाबीची इतिवृत्त नोंदवहीत नोंद घेईल.

प्राधिकृत अधिकारी नामनिर्देशनपत्र माघारी घेणाऱ्या उमेदवारांच्या नावाची उद्घोषणा करेल व इतिवृत्त नोंदवहीत त्यांचे स्वाक्षरीसह नोंद घेईल.

प्राधिकृत अधिकारी अंतिम पात्र निवडणुक लढवणाऱ्या उमेदवारांचे नावाची उद्‌घोषणा करेल (निवडणुक नियमातील नमुना इ-७) व त्याची इतिवृत्त नोंदवहीत नोंद घेईल

प्राधिकृत अधिकारी समिती सदस्य पदासाठी निर्धारीत संख्येएवढीच नामनिर्देशने प्राप्त झाल्यास, त्यांची समिती सदस्य म्हणुन निर्विरोध निर्वाचनाची घोषणा करुन नवनिर्वाचित सदस्यांची नावे घोषित करील व तशी नोंद इतिवृत्त नोंदवहीत घेईल. (निवडणुक नियम नमुना इ-९) किंवा,

समिती सदस्य पदासाठी निर्धारीत संख्येपेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रे माघारी नंतर शिल्लक राहील्यास प्राधिकृत अधिकारी, प्रवर्गनिहाय उमेदवारांच्या नावाची घोषणा करुन अधिमंडळाच्या बैठकीत निवडणुक प्रक्रीया पार पाडतील. तथापि अंतीम मतदार यादीत नावे समाविष्ट असलेल्या सभासदांना मतदान करण्याचा हक्क आहे याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता प्राधिकृत अधिकाऱ्याने घ्यावी. तसेच प्राधिकृत अधिकाऱ्यास मत देण्याचा अधिकार नाही. प्राधिकृत अधिकारी प्रक्रीया पार पाडले नंतर निवडणुक नियमातील नमुना इ-१७ प्रमाणे निकाल घोषित करेल व त्याची इतिवृत्त नोंदवहीत नोंद घेईल.

प्राधिकृत अधिकारी समिती निवडणुकीसाठी बोलावलेली अधिमंडळाची विशेष बैठक समाप्त झाल्याची घोषणा करेल. सभा समाप्तीचे घोषणेनंतर प्राधिकृत अधिकारी उपस्थित सभासदांना इतिवृत्तांत बंद केल्याबद्दल स्वाक्षरी करण्याची सुचना देईल आणि सर्व उपस्थितांच्या स्वाक्षरीनंतर स्वत:ची स्वाक्षरी व शिक्क्यासह इतिवृत्त नोंदवही बंद करेल.

तद्‌नंतर, प्राधिकृत अधिकारी सभेच्या दिनांकाच्या लगतच्या कार्यदिवशी विहीत नमुन्यातील निवडणुक निकालपत्रासह अधिमंडळाचे विशेष बैठकीचे इतिवृत्तांताची प्रत सही शिक्क्यानिशी संस्थेस व तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करील.

## निवडणूक निधी

| अक्र. | सभासद संख्या | निवडणूक निधी |
|---|---|---|
| १ | ५० किंवा त्यापेक्षा कमी | ४००० |
| २ | ५१ ते १०० | ५००० |
| ३ | १०१ ते २०० | ७५०० |
| ४ | २०१ ते त्यापुढील | १०००० |

'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूक निधी पोटी विहीत मर्यादेपेक्षा जादा रक्कमेची मागणी करु नये. प्राधिकृत अधिकारी यांचेकडुन निवडणूक निधी पोटी परस्पर रक्कम वसुल होणार नाही याची काटेकोर दक्षता संबधित प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी घ्यावी. संस्थेच्या जमा निधीबाबत संस्थेस आवश्यक ती पावती द्यावी. अखर्चित निवडणूक निधी संस्थेस तातडीने परत करण्यात यावा.

**मानधन**

**प्रभाग सहकारी निवडणूक अधिकार यांचे मानधन** :- प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचे मानधन नफयातील संस्थांसाठी रु.७५०/- आणि तोटयातील संस्थांसाठी रु.५००/- अनुज्ञेय राहील.

**प्राधिकृत अधिकारी यांचे मानधन** :- नफयातील संस्थाकरीता - निवडणूक झाल्यास रु.२०००/- आणि बिनविरोध झाल्यास रु.१०००/- अनुज्ञेय राहील. तोटयातील संस्थांकरीता - निवडणूक झाल्यास रु.१५००/- आणि बिनविरोध झाल्यास रु.७५०/- अनुज्ञेय राहील.

**पदाधिकारी निवडणूक अध्यासी अधिकारी मानधन** :- पदाधिकारी निवडीसाठी अध्यासी अधिकारी म्हणुन प्राधिकृत अधिकाऱ्यास रु.२५०/- मानधन अनुज्ञेय राहील.

**प्रवास खर्च** :- प्राधिकृत अधिकाऱ्यास साधारणपणे कमाल ३ फेरीसाठी एकुण प्रवास खर्च रु.७५०/- अनुज्ञेय राहील. त्यापेक्षा जास्त प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

**प्राधिकृत अधिकारी यांचे सहाय्यक मानधन** :- प्राधिकृत अधिकारी यांना निवडणूकी करीता १ सहाय्यक अनुज्ञेय राहील. तसेच त्याचे एकत्रित एकुण मानधन रु.५००/- अनुज्ञेय राहील. त्यापेक्षा जास्त मानधन अदा करण्यात येऊ नये.

**नैमित्तिक रित्या रिक्त होणाऱ्या समिती सदस्यांच्या जागा भरणे** :- सहकारी संस्थेची निवडणूकीनंतर संस्थेच्या नवनिर्वाचित समितीने कार्यभार स्विकारल्यानंतर नैमित्तिक रित्या रिक्त होणाऱ्या समिती सदस्यांच्या जागा भरणेबाबत प्राधिकरणाचे परिपत्रक जा.क्र.७७५०/२६.१०.२०१८ व ३४२८/२८.०३.२०१९ अन्वये कार्यवाही करावी.

**नैमित्तिक रित्या रिक्त होणाऱ्या पदाधिकारी निवडीबाबत** :- संस्थेच्या संचालक मंडळातील नैमित्तिक रित्या रिक्त होणाऱ्या पदाधिकारी यांच्या जागा भरणेबाबत प्राधिकरणाचे परिपत्रक जा.क्र.४१८०/११.०७.१६ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

**उमेदवार नामनिर्देशन पत्र अनामत रक्कम** :- निवडणूक नियमानुसार 'ड' वर्गातील संस्थांच्या संचालक मंडळ सदस्यांची निवड ही संस्थेच्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीत घेणेबाबत तरतुद केलेली आहे. 'ड' वर्गातील समाविष्ट संस्थांची सभासद संख्या व आर्थिक परिस्थिती विचारात घेता अशा प्रकारच्या संस्थांच्या निवडणूकीच्या अनुषंगाने उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रासोबत भरावयाच्या ठेव रक्कमेमधून अशा सर्व संस्थांना सूट देण्यात येत आहे.

**अर्हता दिनांक** :- महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) निवडणूक नियम २०१४ चे नियम ६ (२) च्या पहिल्या परंतूकात 'अधिनियमाचे कलम २७ च्या पोटकलम (३-अ) मध्ये नमुद केलेली सभासद म्हणुन नावनोंदणी केल्याच्या दिनांकापासुन करावयाची दोन वर्षाच्या कालावधीची गणना सदर कलमाच्या परंतुकात नमुद केल्याप्रमाणे सहकारी गृहनिर्माण संस्था व सहकारी गाळे संकुल संस्था यांचे करीता केली जाणार नाही' अशी स्पष्ट तरतुद आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता 'ड' वर्गातील सहकारी गृहनिर्माण संस्था व सहकारी गाळे संकुल संस्थांचे अर्हता दिनांक निश्चितीबाबत संख्येने संचालक मंडळाची मुदत ज्या दिवशी संपूष्टात येते त्या दिनांकावरील मतदार यादी तयार करावी. अर्हता दिनांक मिळणेबाबत प्राधिकरणास प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही. तथापी कोणत्याही कारणाने विहित मुदतीत निवडणूक पार पाडली नसेल व निवडणूक घेण्यास विलंब झाला असेल, तर अथवा कायद्यातील तरतूदी नुसार प्रशासक यांची नियुक्ती केली असेल अशा संस्थांच्या निवडणूका घेताना निवडणूक ज्या दिनांकास घ्यावयाची आहे, तो दिनांक अर्हता दिनांक घेऊन निवडणूकीच्या ६० दिवस आधी मतदार यादी तयार करण्यात यावी. तसेच ज्या संस्थांच्या बाबतीत अवसायक नियुक्तीचे अंतरिम आदेश रद्द केले असतील अशा संस्थांच्या बाबत अवसायक नियुक्तीचे अंतरिम आदेश रद्द करण्याचा दिनांक मतदार यादी तयार करण्याकरीता अर्हता दिनांक घेण्यात यावा.

**अधिमंडळ विशेष साधारण सभेत बिनविरोध निवड न झाल्यास निवडणूक घेणेबाबतची कार्यवाही खालीलप्रमाणे :-**

अधिमंडळाचे सभेत समिती सदस्य पदासाठी निर्धारीत संख्येपेक्षा अधिक नामनिर्देशन पत्र माघारी नंतर शिल्लक राहील्यास प्राधिकृत अधिकारी, प्रवर्गनिहाय उमेदवारांच्या नावाची घोषणा करुन अधिमंडळाच्या बैठकीत निवडणुक प्रक्रीया पार पाडतील. सदर निवडणूक प्रक्रीया पार पाडताना अध्यासी अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांनी खालील प्रमाणे कामकाज करणे अपेक्षित आहे.

१. 'ड' वर्ग संस्थांची निवडणूक घेताना सभासदांकडून गुप्त मतदान पद्धतीने मतदान घेण्याची मागणी होईल ही बाब गृहित धरून निवडणुकीची पुर्वतयारी करावी.
२. बोलाविलेल्या सभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर, नामनिर्देशनाचा टप्पा संपल्यावर, जर उपविधीप्रमाणे निवडून द्यावयाच्या विहित जागांपेक्षा अधिक उमेदवार असतील आणि उपस्थित सभासदांपैकी कोणीही गुप्त मतदान पद्धतीने मतदान घेण्याची मागणी केल्यास अध्यासी अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांनी मतदानाचा कार्यक्रम घोषित करावा.
३. त्यासाठी, सर्वप्रथम उमेदवारांची प्रवर्ग निहाय अंतिम यादी प्रसिद्ध करून मतदान व मतमोजणीचा कार्यक्रम सभेच्या ठिकाणी प्रसिद्ध करावा. ( प्रपत्र ९ प्रमाणे )

४. मतदान व मतमोजणीची प्रक्रिया उपस्थित सर्व सभासदांच्या समक्ष संपूर्ण पारदर्शकतेसह पार पाडावी, ज्यामुळे मतदान प्रतिनिधी, मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त करण्याची औपचारिकता पार पाडावी लागणार नाही.

५. विशेष अधिमंडळ सभेस जाण्यापूर्वी, मतपेटी, मोहरबंद करण्याचे लाख, मेणबत्ती इत्यादी साहित्य सभेच्या ठिकाणी आणणे सोयीस्कर होईल अशा ठिकाणी तयार ठेवावे.

६. मतपत्रिका संसाधन उपलब्धतेनुसार संगणक मुद्रित करून किंवा सुवाच्य हस्तलिखित स्वरुपात अचूक तयार करून आवश्यक प्रति झेरॉक्स करून घ्याव्यात. मतपत्रिका साधी वर्णानुक्रमे (Alphabetically) नाव लिहून असावी.

७. मतपत्रिका, मतमोजणी आणि निकाल घोषित करण्यासाठी नमुने सोबत जोडल्या प्रमाणे वापरावेत.

८. अध्यासी अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांनी आवश्यकतेनुसार संस्थेच्या कोणत्याही एका सभासदाची 'सहाय्यक' म्हणून सर्व सहमतीने मदत घ्यावी. याबाबतचे नमुने सोबत जोडण्यात येत आहेत.

वरीलप्रमाणे प्रभाग / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तसेच निवडणूकीसाठी नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांनी 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ तसेच निवडणूक नियम व संस्थेचे मंजुर उपविधी यातील तरतुदीनुसार पार पाडताना उक्त मार्गदर्शक सुचना विचारात घ्याव्यात.

**मा.आयुक्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे मान्यतेनुसार.**

सोबत :- वरीलप्रमाणे (प्रपत्र १ ते १०)

०६/०५/२०२०

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. संबंधित जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

## <u>प्रपत्र १</u>

## नामनिर्देशन पत्राचा नमुना

---------------------------------------------------------------------------------------------------

---------- **सहकारी संस्था मर्यादित** -------- **तालुका** ---------- **जिल्हा** ----------- **ची निवडणुक**

मी, याव्दारे --------------------- मतदार संघातुन निवडणुकीतील उमेदवार म्हणुन -------------------- --- नामनिर्देशनपत्र सादर करीत आहे.

उमेदवाराचे पुर्ण नाव :

उमेदवाराचा डाकेचा पुर्ण पत्ता :

वय :

मतदारासंघाचे नाव :

१. राखीव जागा असलेल्या मतदार संघात उमेदवार ज्या जातीचा किंवा जमातीचा किंवा विमुक्त जातीचा असेल त्या जातीचा किंवा जमातीचा किंवा विमुक्त जातीचा उल्लेख करावा.

२. मतदार म्हणुन मतदार संघाच्या मतदारांच्या यादीत उमेदवाराचे नाव नोंदले असलेल्या मतदारसंघाचे नाव

३. नाव सुचविणाऱ्याचे नाव : मतदार यादीतील अनुक्रमांक :

**नाव सुचविणाऱ्याची सही**

४. मतदार संघाच्या मतदाराच्या यादीतील अनुमोदन देणाऱ्याचे नाव व क्रमांक :

**अनुमोदन देणाऱ्याची सही**

<u>प्रपत्र २</u>

## उमेदवाराचे प्रतिज्ञापन

---

निवडुन आल्यास ------------------------------------संस्थेच्या समितीचा सदस्य म्हणुन सेवा करण्याची माझी तयारी मी याव्दारे व्यक्त करीतो.

**उमेदवाराची सही**

अनुसुचित जातीच्या किंवा अनुसुचित जमातीच्या किंवा विमुक्त जातीच्या / भटक्या जमातीच्या / इमाव / विशेष मागासवर्ग उमेदवाराने पुढील आणखी प्रतिज्ञापन करावयाचे आहे.

मी, याव्दारे सत्यप्रतीवर घोषित करीतो की, मी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७३ ब च्या तरतुदीनुसार मी अनुसुचित जाती/ जमाती, विमुक्त जाती/भटक्या जमातीच्या /विशेष मागस प्रवर्ग/ इतर मागास जाती चा आहे व या प्रवर्गासाठी राखीव जागेवर निवडणुक लढवु इच्छितो.

**उमेदवाराची सही**

**<u>प्रपत्र ३</u>**

## पात्र उमेदवारांची नावे घोषित करणे

--------------------------------------------------------------------------------------------

---------------------- सहकारी संस्था म. ------------- तालुका --------------जिल्हा-------ची

मतदार संघातील व्यवस्थापन समितीची निवडणुक :

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा पत्ता | निवडणुक चिन्ह |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| मतदारसंघ | | | |
| १ | | | |
| २ | | | |

**ठिकाण:**

**दिनांक :**

**प्राधिकृत अधिकाऱ्याची सही**

## प्रपत्र ४

## आरक्षित जागेकरीता निवडणुक लढविण्यास नकार पत्र

---

मी, याव्दारे ------------------------------------ या सहकारी संस्थेचा राखीव प्रवर्गातील सभासद असुन माझा राखीव प्रवर्ग अनुसुचित जाती/ जमाती/ विशेष मागास जाती/ इतर मागास जाती/ विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ महिला असुन संस्थेच्या सन ------------ ते सन -------------- या पाच वर्षाकरीता व्यवस्थापन समिती निवडीसाठी होऊ घातलेल्या दिनांक -------------- रोजीच्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीत उमेदवार म्हणुन निवडणुक लढविण्यास या नकारपत्राव्दारे नकार देत आहे. असा नकार मी, कुणाच्याही दबावाखाली न देता स्वखुशीने देत आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :**

**सही :**
**नाव :**

## <u>प्रपत्र ५</u>

## मतपत्रिकेचा नमुना

-------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------सहकारी संस्था मर्यादीत------------------- तालुका--------------- जिल्ह्याची ---------------- मतदारसंघातील निवडणुक --------------- निवडणुकीचे वर्ष, ------------- मुदतीसाठी.

| उमेदवाराचे नाव | नेमुन दिलेली निशाणी | खुण करण्याची जागा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | | |

**टीप :** प्रत्येक मतपत्रिकेचा अनुक्रमांक (मतपत्रिकेच्या) दर्शनी भागावरच देण्यात येईल.

<u>प्रपत्र ६</u>

## मतपत्रिकांचा हिशेब

-----------------------------------------------------------------------------------------------

------------------------------ सहकारी संस्था मर्यादीत------------------- तालुका--------------- जिल्ह्याची

---------------- मतदारसंघातील निवडणुक मतदान केंद्र:

| अ.क्र. | मतदान केंद्र क्रमांक व नाव | अनुक्रमांक | एकुण क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | मतदान केंद्राध्यक्षास मतदान केंद्रावर किंवा मतदान केंद्रात एकापेक्षा अधिक मंडप असल्यास प्रत्येक मंडपावर मिळालेल्या मतपत्रिकांची संख्या | | |
| २. | मतदारांना दिलेल्या मतपत्रिकांची संख्या | | |
| ३. | वापरात न आलेल्या मतपत्रिकांची संख्या | | |
| ४. | रद्द केलेल्या मतपत्रिकांची संख्या | | |
| ५. | दुबार नोंदलेल्या वापरलेल्या मतपत्रिकांची संख्या | | |

## <u>प्रपत्र ७</u>

## अविरोध निवडणुकीच्या निकालाचा नमुना

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------ **सहकारी संस्था मर्यादीत**---------------- **मु.**-------- **ता. जि.** ------------

**मतदारसंघातील** -------------- **मुदतीकरीता निवडणुक .**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ नियम ७६ चे तरतुदीस अनुसरुन असे जाहीर करीतो की, श्री.--------------------------- सर्वश्री --------------------------- हे संस्थेच्या ----------------------- मतदारसंघ -------------- मधुन व्यवस्थापन समितीवर -------------------- मतदार संघातील सभासद म्हणुन अविरोध निवडुन आले आहेत. कारण त्या जागेसाठी ते एकच उमेदवार होते.

मी असे प्रमाणपत्र देतो की, वरील सभासद सहकारी संस्थेच्या वर नमुद केलेल्या मतदार संघातुन व्यवस्थापक समितीच्या त्या त्या जागांवर यथोचितरीत्या निवडुन आले आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक :**

**प्राधिकृत अधिकाऱ्याची सही**

# <u>प्रपत्र ८</u>

## निकालपत्र

---------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------ सहकारी संस्था मर्यादीत-------------------- तालुका ------------------

जिल्ह्याची ------------------- मतदारसंघातील निवडणुक .

| मतदान केंद्र | | च्या बाजुने दिलेलया वैध मतांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| अनु.क्र. | नाव | वैधमतांची संख्या | फेटाळलेल्या मतांची संख्या | एकुण मतांची संख्या |
| | १. | | | |
| | २. | | | |
| | ३. | | | |

सभेत नोंदलेल्या एकुण मतांची संख्या :

**ठिकाण:**

**दिनांक :**

**प्राधिकृत अधिकाऱ्याची सही**

<u>प्रपत्र ९</u>

## निवडणुक परिणामाच्या आणि समितीच्या सदस्यांची नावे प्रस्तुतिकरणाचा नमुना

--------------------------------------------------------------------------------

**------------------------------- सहकारी संस्था मर्यादीत-------------------- तालुका ------------------**

**जिल्ह्याची ------------------- मतदारसंघातील निवडणुक परिणाम.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव व पत्ता | उमेदवारास मिळालेल्या वैध मतांची संख्या |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |

वैध मतांची एकुण संख्या :

अवैध मतांची एकुण संख्या :

मतांची एकुण संख्या :

मी घोषित करीतो की,

नाव --------------------------------------------------- पुर्ण पत्ता -------------------------------------

------------------------ हे यथोचितरीत्या निवडुन आलेले आहेत.

दिनांक :

**प्राधिकृत अधिकाऱ्याची सही**

<u>प्रपत्र १०</u>

**निवडणुक कार्यक्रम** (उदाहरणा दाखल)

---

विशेष अधिमंडळाचे बैठकीत सहकारी संस्थेची समितीची निवडणुक गुप्त मतदान पध्दतीने घेणेची सभासदांची मागणी झाल्यास गुप्त मतदान पध्दतीने निवडणुक घेणेसाठीचा निवडणुक कार्यक्रम.

| अ.क्र. | तपशील | वेळ | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अंतिम मतदार यादीत नावे समाविष्ट असलेल्या सभासदांकडुन नामनिर्देशन पत्र स्विकृत करणे | ११.३०-१२.०० | |
| २ | प्राप्त नामनिर्देशन पत्र छाननी करणे | १२.०० ते १२.३० | |
| ३ | छाननीअंती पात्र उमेदवारांची नावे घोषीत करणे | १२.३० ते १२.४५ | |
| ४ | नामनिर्देशन पत्र माघारी घेणे | १२.४५ ते १.१५ | |
| ५ | निवडणुक लढवणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी घोषीत करणे | १.३० ते १.४५ | |
| ६ | मतदानाची वेळ (गरज असल्यास) | २.३० ते ३.३० | |
| ७ | मतमोजणीची वेळ | ३.४५ ते संपेपर्यंत | |
| ८ | प्राप्त मतांची संख्या घोषित करणे | मतमोजणी संपताच | |
| ९ | निवडुन आलेल्या उमेदवारांची नावे घोषित करणे | मतमोजणी संपताच | |

**प्राधिकृत अधिकाऱ्याची सही**